माहितीचा अधिकार

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
### संचालनालय, लेखा व कोषागारे

ठाकरसी हाऊस, मुंबई पोर्ट ट्रस्ट,
३ रा मजला, जे. एन. हर्डिया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१
दूरध्वनी क्र.०२२-२२ ६२ २०२९/२२ ६२ २०३६ E-mail:dd.admin@mahakosh.in/aao.prashakosha-mh@gov.in

क्रमांक : संलेको/प्रशा-कोषा/कार्या७/प्र.क्र.४७/२०२२/५७ दिनांक : 17 JAN 2022

***विषय :- दिनांक २६.१०.२००४ चा शासन निर्णय रद्द करण्यात आल्याचे पार्श्वभूमीवर मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.२५०४८/२०१८ मध्ये पारित केलेल्या दिनांक २७.०२.२०२० चे निर्णयाचे संबंधाने कार्यवाही करण्याबरोबरच अशा प्रकरणी सदरील कर्मचारी / निवृत्तीवेतन धारक आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १०, २० व ३० चे लाभाकरीता पात्र असल्यास त्यांना सदरील लाभ अनुज्ञेय करणेबाबत.***

*संदर्भ* :

१. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेवाप्र १२.०२/प्र.क्र.१५८/कोषा-प्रशा-४,दिनांक २६.१०.२००४
२. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचा विशेष अनूमती याचिका क्र.२५०४८/२०१८ मध्ये पारित केलेला अंतिम निर्णय दिनांक २७.०२.२०२०.
३. संचालनालयाचे पत्र क्र संलेको/प्रशा-कोषा/कार्या-७/प्र.क्र.४७/२०२०/२६२/११०३/२०२०, दिनांक ०३.०३.२०२०.
४. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचे पत्र क्र.न्यासप्र-२०१५/प्र.क्र.२४/कोषा (प्रशा-३), दि.१९.१०.२०२०
५. संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक संलेको/प्रशा-कोषा/कार्या-७/प्र.क्र.४७/२०२०/८५६, दिनांक ०४.११.२०२०.

## प रि प त्र क

**प्रस्तावना :**

मा. सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी दिनांक २६.१०.२००४ चे महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचे शासन निर्णयानुसार “कालबद्ध प्रगती योजना / आश्वासित प्रगती योजने” अंतर्गत लाभ घेतलेल्या कर्मचाऱ्यांकडून दिनांक ०४.१२.२०१४ नंतरचे कालावधीसंदर्भातील वसुलीचे अनुषंगाने शासन वित्त विभागास संचालनालयाचे उपरोक्त संदर्भीय क्र.३ वरील दिनांक ०३.०३.२०२० चे पत्रान्वये सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाचे संदर्भाने शासन वित्त विभाग यांनी उपरोक्त संदर्भीय क्र.४ दिनांक १९.१०.२०२० रोजीचे पत्रान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्याबाबत सर्व विभागीय सह संचालक, लेखा व कोषागारे यांना तसेच संबंधितांना योग्य ती कार्यवाही

संबंधाने सविस्तर सूचना / निर्देशित करण्यात आलेल्या आहेत. तशा प्रकारचे सुस्पष्ट आदेश आवश्यकतेनुसार संबंधित कार्यालय प्रमुखांना विभागीय सहसंचालक यांचे स्तरावरुन देण्याबाबत आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्याबाबत देखील निर्देशित केले आहे.

तथापि संचालनालयाकडील निरीक्षण दौरा व काही बाधित कोषागार लिपिक यांच्या भेटीच्या माध्यमातून मा. संचालक महोदयांच्या पुढीप्रमाणे बाबी निदर्शनास आणून देण्यात आलेल्या आहेत.

१. उपरोक्त न्याय निर्णयामुळे बाधित झालेल्या कोषागार लिपिकांच्या बाबतीत वेतन / निवृत्तीवेतन श्रेणीमध्ये सुधारीत करण्यात आले असल्याने संदर्भांकित परिपत्रकानुसार अतिप्रदान वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

२. तथापि, असे असले तरी निम्न वेतनश्रेणी वेतन / निवृत्तीवेतन सुधारित होऊन सुध्दा काही बाधित कोषागार लिपिकांचा सेवा कालावधी व अर्हतेच्या आधारावर प्राप्त पदोन्नती यामुळे लाभासाठी पात्र ठरत असलेल्या कर्मचाऱ्यांना / निवृत्तीवेतन धारकांना सामान्यत: अनुज्ञेय असलेल्या आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देण्याची कार्यवाही उपरोक्त मा. सर्वोच्च न्यायालयीन स्तरावरील अंतिम आदेशांच्या अनुषंगाने स्थगित करण्यात आली आहे.

तदअनुषंगाने अशा स्वरुपाच्या प्रकरणातील बहुतांशी कोषागार लिपिक सेवानिवृत्त असून त्यातील काही मयत झालेले आहेत ही बाब लक्षात घेऊन अशी प्रलंबित प्रकरणे काळजीपूर्वक व तातडीने निकाली काढणे व संबंधितांना देय व अनुज्ञेय लाभांचे प्रदान होणे आवश्यक आहे.

यास्तव, ***दिनांक २६.१०.२००४ चा शासन निर्णय रद्द करण्यात आल्याने*** प्रस्तुत प्रकरणी वसूलीचे संबंधाने विभागीय स्तरावरुन वेतनाची पुनर्निश्चिती तसेच सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे बाबतीत सेवा निवृत्ती वेतनाची अथवा कुटुंब निवृत्ती वेतनाची सुधारित पुर्ननिश्चिती करण्यासंबंधाने कार्यवाही करण्यात येत असली तरी देखील आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ मिळण्यास पात्र ठरत असल्यास अशा कर्मचाऱ्यांना /निवृत्तीवेतन धारकांना संबंधित शासन निर्णयातील तरतुदीअधीन आवश्यक ती कार्यवाही करणे अत्यावश्यक असल्याने यासंदर्भात पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. संबंधित विभागीय सहसंचालक यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या अशा प्रकरणांचा आपले स्तरावरुन तसेच जिल्हा कोषागार अधिकारी यांचे स्तरावरुन शोध घेण्यात यावा, तदनंतर अशा प्रकरणी संबंधितांना सुधारित आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय होत असल्यास अशी प्रकरणे तात्काळ निकाली काढणेबाबत कार्यवाही करावी.

२. सेवानिवृत्त लाभार्थी कर्मचाऱ्यांच्या / मयत प्रकरणी कुटुंब निवृत्तीवेतन धारक / नाम निर्देशन सदस्य हे सदरील लाभांसंदर्भात अनभिज्ञ असण्याची शक्यता असल्याने अशा वंचित प्रकरणांची देखील प्राधान्याने दखल घेऊन आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्यासंबंधाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

३. आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १०,२० व ३० चा लाभ अनुज्ञेय असलेली अशी प्रकरणे पूर्णत: निकाली अथवा निरंक होईपर्यंत जिल्हा कोषागार अधिकारी यांनी त्यांचेकडील स्थितीदर्शक प्रगती अहवाल संबंधित विभागीय सह संचालक यांचेकडे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत व विभागीय सहसंचालक

यांनी एकत्रित रित्या अहवाल संचालनालयास प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करण्याची दक्षता घ्यावी.

४. प्रस्तुत विषयांकित प्रकरणी सेवा पुस्तके वेतन पडताळणी पथकास मान्यतेसाठी सादर करताना / केल्यानंतर अशा वेळी याबाबतची संवेदनशीलता लक्षात घेऊन विभागीय सह संचालक यांनी त्यांचे अधिनस्त वेतन पडताळणी पथकास ही प्रकरणे प्राधान्यक्रम वर्गवारीमध्ये घेण्याबाबत व त्यानुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपले स्तरावरुन सूचित करण्यात यावे.

(वैभव राजेघाटगे)
संचालक,
लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत माहिती व पूढील कार्यवाहीस्तव :**

१. सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२. सह संचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे.
३. सह संचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग, नाशिक.
४. सह संचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर.
५. सह संचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती.
६. सह संचालक, लेखा व कोषागारे, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

/- सर्व विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे यांना निर्देशित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपले अधिनस्त वेतन पडताळणी पथक यांचे निदर्शनास आणून त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही होत असल्याची खातरजमा करावी.